N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0164  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):** 08/03/2026 00:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 07/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 07/03/2026
**Time From (वेळेपासून):** 13:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनाक ):** 07/03/2026  **Time (वेळ):** 23:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनाक आणि वेळ):** 07/03/2026 23:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 4 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** श्रीराम हटेल,शिवुर रोड, वैजाप,व अलोसे श्रीकवाडे यांचे राहते, घर आयोध्यानगर, शिव मंदिराजवळ, ,वैजापुर या ठिकाणी
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाळासाहेब सदाशिव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाज, वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाज, वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9923338565

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. निखिल अशोक कवाडे | | | 1. आयोध्यानगर, शिव मंदिराजवळ,,वैजापूर, ता वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद                    दि. 07/03/2026

मी बाळासाहेब सदाशिव शिंदे, वय 39 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर रा. प्लॉट नं. 178, श्री समर्थ बंगलो, गायकवाड प्री-स्कुल जवळ, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9923338565

मी दिंनाक 07/03/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला तक्रारदार श्री.विलास सखाराम गोरे, वय 39, व्यवसाय समर्थ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स रा. रेणुकानगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर हे येवुन भेटले, सदर वेळी त्यांनी कळविले की, त्यांचे एका लोकसेवकाविरोधात तक्रार आहे. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी लेखी तक्रार दिली की, " माझे नाव विलास सखाराम गोरे, वय- 39 वर्षे व्यवसाय- समर्थ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, रा. रेणुका नगर गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9595663322

मी वर नमुद प्रमाणे असुन नमुद पत्यावर माझे कुटुंबीया समवेत राहण्यास आहे. माझा समर्थ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स चा व्यवसाय असुन मी जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा परिषद अंतर्गत भाडे तत्वावर गाडया पुरवठादार असुन मी सन 2016-2017 पासुन अधिकाऱ्यासाठी लागणारे वाहन भाडेतत्वावर देत असतो.

जिल्हा जसंधारण विभाग येथे ऑक्टोबर 2025 पुर्वी समर्थ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स व दि. 01/10/2025 ते दि. 30/09/2026 ह्या कालावधी करिता ज्योती टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स या नावाने वाहन पुरवठा करारनामा केलेला आहे. त्या करार नाम्यानुसार प्रती महिना प्रथम 2000 कि.मी. वापरासाठी 44,900/-रु. व त्यानंतरच्या 1000 कि.मी. करीता 12.90/- रु. प्रमाणे प्रति कि.मी. करिता भाडे ठरलेले आहे. त्या नुसार उप विभागीय जल संधारण अधिकारी, वैजापुर यांच्यासाठी महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH 20 GC 3143 ही भाडे तत्वावर दिलेली आहे. सदर वाहनाचे ऑक्टोबर-2025 ते फेब्रुवारी-2026 असे वाहन बिले पेंडींग आहे ते बील मंजुरी करीता, M.B. BOOK, L00K BOOK व कंटेजन्सी बिलाकरीता सहया करुन मंजुरीसाठी पाठविण्याकरीता आज   दि. 07/03/2026 रोजी सकाळी 09.45 वा. सुमारास मला वैजापुर चे उप विभागीय जल संधारण अधिकारी श्री. कवाडे साहेब यांचा मला मो.क्र. 7038424041 या नंबर वरुन माझ्या 9595663322 या मोबाईल क्रमांकावर फोन आला असुन त्यांनी सहया देण्यासाठी तयारीने वैजापुर येथे बोलावले आहे. तरी श्री. कवाडे साहेब मला सहया करुन बिल पुढे पाठविण्यासाठी पैसे मागण्याची शक्यता आहे. मला श्री. कवाडे साहेब यांना लाच देण्याची ईच्छा नाही म्हणुन लाच मागणी विरोधात तक्रार देणेकामी हजर झालो आहे.

मी आज दि. 07/03/2026 रोजी श्री. कवाडे साहेब उप विभागीय जल संधारण अधिकारी, उप विभाग वैजापुर यांची वैजापुर या ठिकाणी प्रत्यक्षात जावुन भेट घेणार आहे. सदर भेटी प्रलंबीत M.B. BOOK, L00K BOOK व कंटेजन्सी बिले यावर त्यांनी सहया करावे या करिता चर्चा करणार आहे. सदर चर्चेत त्यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. माझ्या आणि श्री. कवाडे साहेब यांच्या दरम्यान कोणताही वाद किंवा वैमनस्य नाही तसेच आमच्या दोघांत कोणताही देवान घेवान आर्थिक व्यवहार नाही. मी माझ्या तक्रारीसोबत वाहन पुरवठा आदेशाच्या छायांकीत प्रती सोबत जोडल्या आहेत." या मजकुराची स्व: हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली आहे.

त्यावेळी तक्रारदार गोरे हे अभि. लोकसेवक श्री. कवाडे साहेब, उप विभागीय जलसंधारण अधिकारी, वैजापुर यांना दि. 07/03/2026 रोजी त्यांनी बोलविल्या प्रमाणे वैजापुर येथे भेटण्यास जाणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी लागलीच महानगरपालीका कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातुन लेखी पत्र देवुन दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार श्री गोरे यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करुन दिली. मी सर्वांना तक्रारीची पडताळणी वैजापुर या ठिकाणी जावुन करणार आहोत असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांची लेखी तक्रार मी व पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या. सदर वेळी कारवाई कामी आवश्यक सर्व साहित्य

कार्यालयातुन ताब्यात घेवुन सापळा पथक, पंच आणि तक्रारदार श्री.गोरे असे त्यांच्या मालकीच्या अर्टीका वाहन क्र. MH-14 HU 1043 यामध्ये 12.16 वा. बसुन 13.18 वा. वैजापुर येथे पोहोचलो. सदर वेळी तक्रारदार श्री.गोरे यांनी त्यांचा मो.क्र. 9595663322 यावरुन अलोसे श्री. कवाडे यांचा मो.क्र. 7038424041 यावर संपर्क साधुन भेटीबाबत विचारणा केली असता, ते कामानिमित्त बाहेर असल्याचे सांगुन दुपारी 03.00 वा. पर्यंत येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी दुपारी 03.00 वा. सुमारास अलोसे श्री. कवाडे यांना भेटीबाबत मोबाईलवर संपर्क साधुन विचारणा केली असता, त्यांनी श्रीराम हॉटेल, शिवुर रोड, वैजापुर येथे भेटीसाठी बोलावले.

तक्रारदार यांच्या तक्रारीचे अनुषंगाने अलोसे श्री. कवाडे हे लाचमागणी करतात किंवा कसे ? याची तक्रारदार यांचे सोबत पंच क्र.01 यांना सोबत पाठवुन आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार गोरे व पंचांची खात्री करुन दिली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु बंद करण्याचे प्रात्याक्षीक दाखवले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.11 वा. चालु करुन, तो तक्रारदार गोरे यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन त्यांना व पंच नं. 01 सोबतीने श्री. कवाडे, उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांची भेट घेण्याकरीता त्यांच्या वाहनात पाठविले. तक्रारदार व पंच क्रं 1 असे अलोसे श्री. कवाडे यांना श्रीराम हॉटेल, शिवुर रोड, वैजापुर येथे जावुन तक्रारदार यांचे प्रलबीत कामकाजासंदर्भात भेटुन पुन्हा आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 15.51 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना श्री. कवाडे, उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, ते तक्रारदार गोरे यांचे सोबत श्री.कवाडे यांच्या भेटीसाठी श्रीराम हॉटेल याठिकाणी गेलो असता, श्री.कवाडे तक्रारदार व मला त्यांच्या राहत्या घरी घेवुन गेले. त्याठिकाणी त्यांनी तक्रारदार यांचे प्रलंबीत M.B. BOOK, L00K BOOK व कंटेजन्सी बिले यावर श्री. कवाडे यांनी सहया कराव्या यासाठी चर्चा झाली. सदर चर्चेत प्रलंबीत बुकांवर सहया करण्यासाठी श्री. कवाडे यांनी प्रथमत: 10,000/- रु. लाचमागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रु लाचरक्कम स्विकारण्याचे कबुल करुन लाच रक्कम मो. क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे वर पाठविण्यास सांगितले आहे. त्यानंतर आम्ही तक्रारदार गोरे यांच्याकडे विचापुस केली असता त्यांनीदेखील पंच.क्र. 01 यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे माहिती दिली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेर्काडर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार आणी श्री.कवाडे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता दिल तर चालतं नाही दिंल तरी चालतं, काय ठरलेले आहे तुमच्याकडे, तुम्हालावाटलं ते दयाफक्त जोनवारी च दया तुम्हाला वाटल ने दुऊन टाका आणि विषय संपवुन टाका, तुमचं ठरलले काय आहे ते मला एकदा सांगा, तुम्ही जे बोलणार आहे त्याच्या पेक्षा मी 100 टक्के मी सांगणार आहे, तुम्ही ATM वरुन काय आणता किती आणता चला बोला, जे सोमवारी करायचं आहे ते सोमवारी करु नका आत्ताच करुन मोकळ होऊन जा, 30 हजार राहिल आता काय करायचं, सात हजार रुपये राहिले आता काय करायचं सात हजार रुपये माझा खर्च झालेला आहे वर 3 हजार रुपये दया असं, 10 हजार रुपयामध्ये तुकडा पाडा आणि तुम्हाला दया वाटल तर दया नाहीतर नका देऊ, 10 हजार रुपये भी काय तुम्हाला मोठी गोष्ट सांगितली नाही, 7 हजार रुपये ठिक आहे दया पाठवुन, तुम्ही कोणालातरी ऑनलाईन मारुन टाका याच्या नंतर मी तुम्हाले भेटणार नाही, एक नंबर देतो घ्या, 7507187143, आता टाकुन दया हयाच्यावर हातो हात टाकुन दया याच्यावर असे होते. त्यावरुन असे दिसुन येते की, अलोसे श्री. कवाडे उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे प्रलंबीत वाहनाच्या बुकांवर सहया करण्यासाठी श्री. कवाडे यांनी प्रथमत: 10,000/- रु. लाचमागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रु लाचरक्कम स्विकारण्याचे कबुल करुन लाच रक्कम मो.क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे वर पाठविण्यास सांगुन लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे व श्री. कवाडे,उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांनी केलेल्या लाचमागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई सुरु केली.

त्यानंतर तक्रारदार गोरे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी गोरे यांनी त्यांचे मोबाईल मधील फोन-पे या ऍपमध्ये 7,000/- रु. बॅलेन्स असल्याचे पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर तक्रारदार गोरे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, श्री. कवाडे उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांनी लाच रक्कम स्विकारल्यानतर तक्रारदार यांनी त्यांचे डोळ्यावर लावलेला काळा चष्मा काढुन डोक्यावर ठेवण्याचा इशारा नेमुण दिला. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 16.37 वा चालु करुन तो तक्रारदार गोरे यांचे गळयात अडकवुन पंच क्रं 1 सह सापळा कारवाईकामी तक्रारदार याचे स्वत:चे वाहनातुन श्री. कवाडे उप विभागीय जलसंधारण अधिकारी

यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे पायी श्री. कवाडे उप विभागीय जलसंधारण अधिकारी यांच्या राहत्या घराजवळ असलेल्या शिव मंदिरात तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे श्री.कवाडे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे राहते घराच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या खोलीत जाताना दिसले. त्यानंतर तक्रारदार हे श्री.कवाडे यांची भेट घेवुन त्यांचे खोलीतुन खाली मंदिरा समोर येवुन पथकास दिसेल अशारितीने त्यांनी त्यांचे डोळयावरील चष्मा काढुन डोक्याचे वर ठेवुन अभिकथीत लोकसेवक याने पैसे स्विकारल्याचा 16.40 वा नियोजीत इशारा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं. 2 व सापळा पथक सक्रीय होवुन तक्रारदारास सोबत घेवुन श्री.कवाडे यांचे पहील्या मजल्यावरील राहत्या खोलीत गेलो. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर 16.47 वा. बंद केले. तसेच खोलीतील इसमास यांना आहे त्या स्थितीत थांबण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचेसमक्ष पंच क्रं. 1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं. 1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे श्री. कवाडे यांची भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार गोरे यांनी श्री. कवाडे यांचे सोबत कामासंदर्भात चर्चा करुन त्यांनी मागणी केलेली 7,000/- रु. लाचमागणी रक्कम सांगितल्या प्रमाणे मो.क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे वर पाठविण्याबाबत पुन्हा खात्री केली असता, श्री. कवाडे यांनी त्यास होकार देवुन लाचरक्कम पाठविण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलमधील फोन-पे द्वारे मो.क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे वर 7,000/- रु. लाचरक्कम पाठवुन श्री. कवाडे यांना मोबाईल मधील फोन-पे ऍप दाखवुन खात्री करुन दिली. तसेच लाचरक्कम समोरील व्यक्तीस प्राप्त झाली आहे का या बाबत फोन लावुन खात्री करण्यास तक्रारदार याने श्री. कवाडे यांना सांगितले होते. त्यानंतर मी व तक्रारदार असे खोलीच्या खाली येवुन शिव मंदिराजवळ येवुन तक्रारदाराने नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Satyajeet Sudhakar Taitwale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

***District*** (जिल्हा):

***on point of jurisdiction*** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

***F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.*** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Satyajeet Sudhakar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, वैजापूर
जि.छत्रपती संभाजीनगर

नमुद फिर्याद मधील उरवरीत फिर्यीद ही सी.सी.टि.एन.एस. प्रणालीमध्ये तीन हजार पेक्षा जास्त शब्द घेत नसल्याने सदरची उरवरीत फिर्याद ही एफ.आय.आर. सोबत स्वतज्य जोडण्यात आली आहे.

विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील कैद झालेले तक्रारदार व श्री कवाडे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता **श्री. कवाडे म्हणतात की, ऐवढा मोठा विषय असतो का त्यो तिकडच्या तिकड करायचं असत ते त्यावर तक्रारदार म्हणाले की, नाही नाही सर माझ्याकडे खरंच 1500/- रुपये कमी होते आता टाकुन दिले क्लिअर केल मलाच ते आवडत नाही.. त्यावर श्री. कवाडे म्हणाले की, तुम्ही सांगायच ना माझ्याकडे नाही आहे म्हणुन त्या काय ऐवढा विषय जबरदस्ती थोडी ना विषय असते आपल्याकड त्यानंतर तक्रारदार यांना श्री. कवाडे यांना त्यांचा मोबाईल मधील फोन पे ने पैसे पाठविल्यानंतर सर हे बघा ना हे बघा सर असे म्हणाले त्यावर श्री. कवाडे म्हणाल की, ओके ना, तुम्ही केलेना मंग काय प्रॉब्लेम आहे दाखवायला कायला पाहिजे.. त्यानंतर तक्रारदार म्हणाले की, हे बगा भागवत रामदास खैरनार, स्क्रिनशॉट पाठवु का तुम्हाला, त्यानंतर श्री. कवाडे म्हणाले की नाही स्क्रिनशॉट नाही त्यानंतर तक्रारदार म्हणाले की, हे बगा झाल, तुम्ही संध्याकाळी घ्या आता कलेक्ट करुन चलुका मी आता असे होते.** सदर संभाषणामध्ये आलोसे श्री कवाडे यांचे सांगण्यावरुन तक्रारदार यांनी मो.क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे वर 7,000/- रुपये लाचरक्कम पाठविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष खोलीतील पलंगावर बसलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. निखिल अशोक कवाडे, वय -32 वर्षे पद- उप विभागीय जलसंधारण अधिकारी, नेम. जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उप विभाग, वैजापुर रा. आयोध्यानगर, शिव मंदिराजवळ, वैजापुर मुळ पत्ता सिद्धीविनायक नगर, मलकापुर, जि. बुलढाणा असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रक्कम तक्रारदारास कोणाच्या फोन-पे वर पाठविण्यास सांगितले होते या बाबत विचारणाकेली असता त्यांनी कळविले की, त्यांच्या ओळखीचे श्री. भागवत रामदास खैरनार, खाजगी कॉन्ट्रॅक्टर यांचे फोन-पे वर तक्रारदारास पाठविण्यास सांगितल्याचे मान्य केले. अलोसे श्री. कवाडे यांच्या ताब्यातुन वाहनाचे M.B. BOOK, L00K BOOK, कंटेजन्सी बिले पंचासमक्ष जप्त केले. तसेच अलोसे श्री. कवाडे यांना जु.वा. मोबाईल पुढील तपासकामी ताब्यात घेण्यात आला आहे. त्यानंतर अलोसे श्री.कवाडे यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी पोलीस ठाणे, वैजापुर, छत्रपती संभाजीनगर ग्रामिण येथे येवुन पंचनामा करुन पुर्ण केली आहे.

तरी दि. 07/03/2026 रोजी 13.11 वा ते 16.47 वा दरम्यान श्रीराम हॉटेल,शिवुर रोड, वैजापुर व अलोसे श्री.कवाडे यांचे राहते घर आयोध्यानगर, शिव मंदिराजवळ, वैजापुर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार विलास सखाराम गोरे, वय- 39 वर्ष व्यवसाय- समर्थ टुर्स ऍन्ड ट्रॅव्हल्स, रा. रेणुका नगर गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रलंबीत वाहनाच्या बुकांवर सहया करण्यासाठी श्री. कवाडे यांनी प्रथमत: 10,000/- रु. लाचमागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रु लाचरक्कम स्विकारण्याचे कबुल करुन लाच रक्कम मो.क्र. 7507187143 (भागवत रामदास खैरनार) यांच्या फोन-पे प्राप्त केली आहे. सबब अभिकथीत लोकसेवक श्री. निखिल अशोक कवाडे, वय -32 वर्षे पद- उप विभागीय जलसंधारण अधिकारी, नेम. जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उप विभाग, वैजापुर रा. आयोध्यानगर, शिव मंदिराजवळ, वैजापुर मुळ पत्ता सिद्धीविनायक नगर, मलकापुर, जि. बुलढाणा यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

समक्ष

पोलीस ठाणे वैजापूर (ग्रामीण) छत्रपती संभाजीनगर